**L. A. BILL No. XLVII OF 2026.**

A BILL

TO REPEAL THE MAHARASHTRA INDUSTRIAL RELATIONS ACT.

**सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४७.**

**महाराष्ट्र औद्योगिक संबंध अधिनियमाचे निरसन करण्यासाठी विधेयक.**

१९४७ चा ११. **ज्याअर्थी,** महाराष्ट्र औद्योगिक संबंध अधिनियमाचे निरसन करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र औद्योगिक संबंध (निरसन) अधिनियम, २०२६, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन १९४७ चा अधिनियम क्रमांक ११ याचे निरसन.

**२.** महाराष्ट्र औद्योगिक संबंध अधिनियम, याद्वारे निरसित करण्यात येत आहे. १९४७ चा ११.

व्यावृत्ती.

**३.** (१) महाराष्ट्र औद्योगिक संबंध अधिनियमाचे निरसन झाले असले तरी, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास त्याअन्वये प्रलंबित असलेली कार्यवाही, तसेच तद्अन्वये उद्भवलेले हक्क व दायित्त्वे यांसह विद्यमान तडजोडी, न्यायालयीन आदेश व निवाडे यांची अंमलबजावणी ही, जणू काही हा अधिनयम अधिनियमित करण्यात आला नव्हता असे समजून महाराष्ट्र औद्योगिक संबंध अधिनियमाच्या तरतुदींनुसार चालू राहील व निकालात काढण्यात येईल. १९४७ चा ११. १९४७ चा ११.

(२) महाराष्ट्र सर्वसाधारण वाक्खंड अधिनियमाच्या कलम ७ च्या तरतुदी, महाराष्ट्र औद्योगिक संबंध अधिनियमाचे निरसन झाल्यावर लागू असतील. १९०४ चा १. १९४७ चा ११.

# उद्देश व कारणे यांचे निवेदन

मालक आणि नोकर यांच्यातील संबंधांचे नियमन करण्यासाठी, औद्योगिक विवादांमध्ये तडजोड करण्यासाठी तरतूद करण्याकरिता आणि इतर काही विवक्षित प्रयोजनांसाठी तरतूद करण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक संबंध अधिनियम (१९४७ चा ११) अधिनियमित करण्यात आला आहे.

२. कामगार संघटना औद्योगिक आस्थापना किंवा उपक्रम यांमधील रोजगाराच्या शर्ती, औद्योगिक विवादांची चौकशी व तडजोड यांच्याशी संबंधित असणाऱ्या कायद्यांचे एकत्रीकरण व त्यात सुधारणा करण्यासाठी, आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी संसदेने औद्योगिक संबंध संहिता, २०२० (२०२० चा ३५) अधिनियमित केली आहे. उक्त संहिता, २१ नोव्हेंबर, २०२५ रोजी अंमलात आली असून ती संपूर्ण भारतास लागू आहे. औद्योगिक विवाद, इत्यादींशी संबंधित असणाऱ्या तरतुदींचा, उक्त महाराष्ट्र अधिनियमामध्ये आणि तसेच उक्त संहितेमध्ये समावेश केला आहे. संसदेने उक्त संहितेच्या तरतुदी, या अधिनियमानंतर अधिनियमित केल्याने उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या तरतुदींवर अभिभावी ठरतात. परिणामी उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या तरतुदी राज्यात अप्रवर्तित होतात. म्हणून, महाराष्ट्र औद्योगिक संबंध अधिनियम निरसित करणे इष्ट आहे, असे शासनास वाटते.

३. वरील उद्दिष्टे साध्य करणे, हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक ३० जून, २०२६.

**आकाश फुंडकर,**
कामगार मंत्री.

ɣ

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४७.]**

**[महाराष्ट्र औद्योगिक संबंध अधिनियमाचे निरसन करण्याकरिता विधेयक.]**

**[श्री. आकाश फुंडकर,**
कामगार मंत्री.**]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव–१,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.